RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शेतमजुरांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.कु.रूपाली विश्वनाथ सांभारे** समाजशास्त्र विभाग भारती विद्यापीठाचे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगली.

**प्रस्तावना ः**

भारत हा शेतीप्रधान देश म्हणूनओळखला जातो.भारतातील जवळपास 70 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण भागातील जवळजवळ 80 टक्के लोकांचा व्यवसाय शेती किंवा त्यासंबंधी क्षेत्राशी निगडित असलेला दिसून येतो.शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.शेती उत्पादन राष्ट्रीय उत्पन्नाचा महत्वपूर्ण घटक आहे.तरीही या शेतकरी जनतेचा विचार अजूनही केला जात नाही. आज महाराष्ट्रात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली शेतकरी चळवळ असेल किंवा स्वाभिमानी संघटनेचे आंदोलन असेल या लढयातुन शेतकरी वर्ग आपला असंतोष व्यक्त करत आहे. पण भारताने उदयोग आणि माहीती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती केली असली तरी भारताची खरी ओळख कृषीप्रधान देश अशीच आहे.गेल्या काही वर्षापासुन शेतकरी आत्महत्या हा विषय ही देशभर गाजत आहे. देशात गरीब आणि श्रीमंत यांच्यामधील दरी दिवसेंदिवस रूंदावत चालली आहे.पण शेतमजूर यांच्या प्रश्नाकडे अजूनही संशोधकांनी, अभ्यासकांनी किंवहूना शासनाने देखील अजून लक्ष देणे गरजेचे आहे.

भारतासारख्या विकासनशील देशात शेतकरी वर्गाची परिस्थिती आधीपासून दयनीय आहे. पूर्वीपासूनच शेतकरी वर्गाचे हाल चालू होते.नव्या व्यवस्थेमुळे आणि नव्या संदर्भामुळे ते आणखी वाढले आहे.शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी यांचा आक्रोश महात्मा फूलेंनी 'शेतक-यांचा आसुड' या ग्रंथामध्ये समग्राने प्रकट केला आहे.महात्मा फुलेंच्या मते , देशातील एकूण परंपराच अशी की पुस्तकी, शाब्दिक ज्ञानाची ओझे वाहणारे श्रेष्ठ आणि संबंध अर्थव्यवस्थेचा कणा वाहणारा कष्टकरी समाज मात्र उपेक्षित व अप्रतिष्टित आहे.महात्मा फुल्यांनी शेतकरी वर्ग, कष्टकरी वर्ग हा प्रतिष्ठित असला पाहिजे यादृष्टीने प्रथमःतच विचार मांडले.महात्मा फुलेंचा हा ग्रंथ प्रामुख्याने शेतक-यांची हालाखी व दुःखे प्रकट करणारा आहे.

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे एकूण लोकसंख्येत शेतीवर उपजीविका करत असलेल्यांची संख्या अधिक आहे.त्यामुळे शेती क्षेत्र भारतीय राज्यव्यवस्थेत महत्वाचे आहे कारण शेतीक्षेत्रात घडणा-या गोष्टींचा बदलाचा परिणाम एकंदर अर्थव्यवस्थेवर होतो.भारताला स्वातंत्र मिळण्यापूर्वीच्या काळात ज्या शेतकरी चळवळ झाल्या याकडे स्वतंत्र चळवळीचा भाग म्हणून शेतकरी आंदोलनाकडे पाहिले गेले. भारताला स्वातंत्र मिळण्यापूर्वी व त्यानंतरच्या काळात ज्या शेतकरी चळवळ झाल्या त्यामध्ये महात्मा फुले व आंबेडकर यांनी देखील शेतकरी वर्गाच्या प्रश्नावर आवाज उठविला असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उददिष्टये ः**

1) शेतमजूरांची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2) शेतमजूरांच्या समस्येचे स्वरूप अभ्यासणे.
3) शेतीच्या यांत्रिकीकरणाचा शेतमजूरांवर झालेला परिणाम

**संशोधन पध्दतीशास्त्र ः**

प्रस्तुत शोधनिवंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत ः**

प्रस्तुत शोधनिवंध हा दुय्यम स्त्रोतावर आधारित असून विविध अभ्यासक, संशोधकांनी लिहिलेल्या पुस्तके, मासिके व इंटरनेट इ.चा वापर या शोध निवंधासाठी करण्यात आला आहे.

मा.डॉ द.ना.धनागरे यांच्या मते, शेतीचे व्यापारीकरण जरी झाले असले तरी त्याला मोठया प्रमाणात शेतीच्या आधुनिकतेची साथ मिळाली नाही. भारतामध्ये झालेल्या शेतीच्या व्यापारीकरण्याच्या प्रगतीमुळे भाडेपट्टयावर जमीन कसण्या-यांच्या नातेसंबंधात कसलाच फरक पडला नाही.याचा परिणाम सावकार, व्यापारी, स्थानिक उद्योगधंदेवाले तसेच श्रीमंत ग्रामीण असोत या सर्वाचा उत्पादनाचा मोठा हिस्सा वाटला आणि प्रचंड नफा कमावला.यासाठी कधी जबर

व्याजवसुली, जुलुम, शोषण याचा वापर केला. शेतीच्या व्यापारीकरण्याच्या अशा प्रकारच्या प्रगतीमुळे ग्रामीण जनतेवरील ओझे असहय झाले आणि त्यामुळे शेतकरी याविरूध्द आवाज उठवू लागले .उदा.मलबारमधील मोपला बंड असेल, बंगालमधील तेभागा, आंध्रमधील तेलंगणा, गुजरातमधील खेडा यासारख्या चळवळीमध्ये शेतकरी वर्गासमवेत शेतमजूरही सहभागी झालेले दिसतात.

डॅनिअल थॉर्नर यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय ग्रामीण जनतेची तीन वर्गात विभागणी केली आहे ती म्हणजे, 1) मालक, 2) किसान आणि 3) मजूर. भारतासारख्या विकसनशील देशात शेतमजूराची परिस्थिती दयनीय असलेली दिसून येते.त्यातच अनियमीत पडणारा पाऊस, तसेच कर्जाचा वाढता बोजा व यात आणखी भर म्हणजे वाढती महागाई.शेतमजूर हा भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचा आणि खेडे विभागामधील आर्थिक व सामाजिक जीवनाचा एक अभिन्न व महत्वपूर्ण घटक आहे.

शेतमजूर हे बहुधा आर्थिक आणि सामाजिक दृष्टया मागासलेल्या वर्गातून येतात. शेतमजूरांना काबाडकष्ट करण्याव्यतिरिक्त दुसरा कोणताच पर्याय नाही त्यांच्यासाठी कष्ट हेच त्यांचे भांडवल आहे, सर्वकाही आहे त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थीती एकदम हलाखीची असलेली दिसते कारण कष्टाच्या मानाने मिळणारी मजूरी ही अल्प असते. नियोजन मंडळाच्या मते, 'शेतमजूरांचा प्रश्न म्हणजे एक निःसदिग्ध आव्हानच आहे आणि हया प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक करण्याचे उत्तरदायित्व संपूर्ण समाजावर आहे.'

शेतमजूर या संकल्पनेत कोणाचा समावेश करावा हे आपण सुरूवातीला समजून घेवू.

**1) राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते ः-**

'ज्या व्यक्ती अकुशल व असंघटित असून उपजीविकेसाठी ज्यांच्याजवळ श्रम हेच साधन आहे त्यांना शेतमजूर म्हणता येईल.'

**2) कृषी मजूर चौकशी (1950 - 51)ः -**

'जे लोक शेतीच्या लागवडीमध्ये गुंतलेले असून त्यासाठी मजुरी घेतात ते शेतमजूर होय.'

किमान वेतन कायदा 1948 हा सरकारने शेतमजुरांनाही लागू केला.परंतु काही राज्यात हया कायदयात शेतमजूर अंतर्भूत करण्यात आलेले नाहीत.ज्या राज्यात हा कायदा लागू झाला आहे तेथे किमान वेतन ठरविण्यात आणि ते अंमलात आणण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नाही.काही राज्यात हे काम महसूल विभागाकडे सोपविण्यात आले असून इतर राज्यांमध्ये हे काम श्रम विभागाकडे देण्यात आलेले आहे.

शेतमजूर हा असंघटित कामगार आहे.संघटीत क्षेत्रातील कामगार हा कायदयाने संरक्षीत आहे त्यांचे कामाचे स्वरूप,वेतन, वेळ, नुकसान भरपाई, रजा, सुटया इ. विषयीचे नियम सरकारने ठरविले आहेत. पण असंघटित कामगारांसाठी कामाचे स्वरूप सर्वत्र सारखे आढळत नाही तसेच कामाच्या वेळा त्याचबरोबर कामाचा मिळणारा मोबदला निश्चित असु शकत नाही.किंबहुना त्यांना मिळणारा कामाचा मोबदला हा त्यांच्या कामाच्या मानाने अल्पच असतो.या असंघटित कामगारासाठी कामाचे स्वरूप, वेतन ,वेळ, नुकसान भरपाई, रजा ,सुटया इ.यासाठी सरकार किंवा मालक कोणताच दर निश्चित करत नाहीत किमान वेतन कायदा पास झाला असला तरी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते.शेतकरी स्वतःच कामाच्या स्वरूपावरून किंवा कामाच्या ठिकाणावरून मजुरीचा दर ठरवितात. त्यामुळे अल्पदरावरच या शेतमजूरांना काम करावे लागते. या कामगारांच्या दैनंदिन गरजा पुर्ण होतील इतकेही वेतन काही वेळा या शेतमजुरांना मिळत नाही. त्यामुळे ज्यावेळी कामाची मंदी असते तेव्हा मालक वर्गाच्या दयेवरच यांना जगावे लागते व या मोबदल्यामध्ये नंतर मालक वर्ग या मजूरांचे आर्थिक शोषण करतात त्यांना कमी पैशामध्ये काम करायला लावुन स्वतःच्या इच्छेनुसार काम करण्यास भाग पाडतात व त्याचा अल्प मोबदला देतात. अशा प्रकारची स्थिती राज्यामध्ये सगळीकडेच असलेली दिसुन येते.औदयौगीक कामगारांसाठी जे कायदे आहेत ते या शेतमजूरांसाठी लागू पडत नाहीत. किमान वेतनाचा कायदा शासनाने जरी लागू केला असला तरी तो सर्वव्यापी स्वरूपाचा नाही. कामाचे स्वरूप सर्वत्र सारखे आढळत नाही. हे कामगार कायम स्वरूपी नसल्यामुळे कोणतीही सुविधा मालकवर्ग, शासन, यांनी पुरविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

शेतमजूरांचे कामावर आधारित वेतन असल्याने मासिक वेतनाची हमी देता येत नाही . वेतनाबाबत निश्चित नियम नसलेने अल्प वेतनावर राबवुन घेतले जाते . पुर्णतः हंगामावरती काम अवलंबून असते . या सर्व प्रश्नांचे निराकरण तो व्यक्तीगत पातळीवर करू शकत नाही त्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असते . परंतु निरक्षर, अज्ञानी व आर्थिक न्युनगंडाने पछाडलेला हा शेतमजूर यासाठी असमर्थ आहे . संघटन बांधणीतील अडथळयामुळे हा वर्ग समाज पटलावरती संशोधक ,अभ्यासक यांच्याकडून दुर्लक्षित राहिला आहे . शेतमजूरांचे आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, आरोग्यविषयक जे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे आहेत त्यातुन मार्ग काढण्यासाठी या प्रश्नांच्या निराकरणासाठी शासनाने वेळीच लक्ष देवून सामाजिक सुरक्षा पुरविणे गरजेचे आहे की ज्यामुळे या कामगारांच्या प्रश्नावर उपाय निघुन उदयाचा येणारा दिवस तरी हा त्यांच्या आयुष्यामध्ये एक आशेचा किरण ठरू शकेल . शेवटी शेतमजूर हा देखील माणुस आहे तो देखील समाजाचा एक महत्वाचा घटक आहे यालादेखील गरजा असु शकतात याचा विचार समाजाने केला पाहिजे . या शेतमजूरांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपआपल्यापरीने प्रयत्न केला मदत केली तरच त्यांनादेखील समाजाबददल आपलेपणा वाटेल व त्यांच्यातील कमीपणाची, न्युनतेची भावना नष्ट होऊन या शेतमजूरांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल .

अलिकडे शेतमजुरांच्या मजुरीचा दर वाढल्यामुळे शेतकरी शेतात जास्तीत जास्त कामासाठी यांत्रिकीकरणाचा मार्ग अवलंबत आहे . यांत्रिक मशीनचा वापर करून कमी वेळ व कमी खर्चात शेतीतील काम होत असल्यामुळे शेतमजुरांना मिळणारे काम कमी होत चालले आहे . उदा . काढणी मशीन, मळणी मशीन, तणनाशक फवारणी पंप इ .

जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रातील बेरोजगारीत वाढ होत आहे . तरीही भारतातील मोठया लोकसंख्येला अजूनही रोजगारासाठी शेती हाच पर्याय आहे . ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक रोजीरोटीसाठी शेतीवर अवलंबून आहेत . या क्षेत्रात रोजगार कमावणा-या लोकांचे प्रमाण **1994- 94** मध्ये **64 . 8** टक्के होते ते **2011 -12** मध्ये **48 . 9** टक्के झाले पण अजूनही जास्तीत जास्त लोकांना रोजगारांसाठी शेतीवरच अवलंबून रहावे लागते .

भारतात शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाचे प्रमाण दुप्पटीपेक्षा अधिक आहे . ग्रामीण भागात राहत असलेल्या गरीब मागासलेल्या लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रामुख्याने शेतीचा व त्यावर अवलंबून असलेल्यांचा विकास करणे गरजेचे आहे . शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी झाला आहे . पण शेती क्षेत्र आजही इतर क्षेत्राच्या तुलनेत जास्त रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे . ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती क्षेत्र असल्याने अर्थसंकल्पातही शेतीच्या विकासासाठी **35 . 984** कोटींची तरतुद केली आहे . शेवटी भारत हा कषीप्रधान देश आहे व भारतातील सर्वाधिक जनता खेडयात राहते . ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचे पंख शेती क्षेत्र आहे . तेव्हा देशातील शेतीक्षेत्राचा व त्यावर अवलंबून असलेल्या जनतेचा विकास होणे हे देशासमोर आव्हान आहे .

**शेतमजुरांच्या दरिद्री आर्थिक परिस्थितीची कारणे :**

**1**) शेतमजुर हा निम्न सामाजिक आर्थिक वर्गातील आहे .

**2**) शेतमजुर हा असंघटित वर्ग आहे .

**3**) शेतमजुरांच्या रोजगारात निरंतरता नाही/ हंगामी काम आहे .

**4**) शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायात काम उपलब्ध नाही .

**5**) आर्थिक पत नसल्यामुळे बॅकेतून कर्ज मिळत नाही त्यामुळे खासगी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते .

**6**) शेतमजुरांच्यामध्ये अज्ञान अशिक्षितपणा किंवा शिक्षणाचा स्तर कमी असलेला दिसून येतो .

**शेतमजुरांची परिस्थिती सुधारण्याचे उपाय**

**1**) शेतमजुरांच्या मध्ये त्यांच्या शोषणाची जाणीव जागृती निर्माण करणे .

**2**) शेतमजुरांच्यासाठी किमान वेतन कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी .

**3**) शेतीसुधारणा करून शेतीत शेतमजुरांना बारमाही रोजगार उपलब्ध करून दयावा .

**4**) शेतमजुरांसाठी संघटना स्थापन व्हाव्यात .

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

5) शासनाने अनेक सार्वजनिक प्रकल्प राबवावेत की जेणेकरून या शेतमजुरांना काम मिळेल.

**शेतमजुरांसाठी शासनाने केलेल्या उपाययोजना**

1) किमान वेतन कायदा अंमलात आणला.
2) जमिनदारी पध्दतीचे उच्चाटन केले गेले.
3) रोजगार हमी योजना राबविली जाते.
4) 20 कलमी कार्यक्रम राबविण्यात आला.
5) कुळ कायदा लागू झाल्यामुळे शेतमजुरांना जमिनीचे वाटप झाले.
6) कामाच्या विविध योजना ग्रामीण भागात राबवण्यात येत आहेत.

**निष्कर्ष :**

1) शेतमजूरांना सामाजिक सूरक्षा पुरविण्याची गरज आहे.
2) शेतमजूरांचे मोठया शेतकरी वर्गाकडून आर्थिक शोषण होते.
3) शेतमजुरांच्यात एकजुट निर्माण झालेली नाही शेतमजुरांच्यात संघटना निर्माण होणे गरजेचे आहे.
4) शेतमजुरांना न्याय हक्क मिळविण्यासाठी शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.
5) शासनाने वेळीच शेतमजूर वर्गाच्या समस्यांचा विचार करावा.
6)यांत्रिकीकरणामुळे जास्तीत जास्त शेतीची कामे मशीनव्दारे केली जात असल्यामुळे शेतमजुरांना शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायामध्ये काम शोधावे लागत आहे.
7)शेतीची कामे हंगामी असल्यामुळे हंगामापुरताच रोजगार मिळतो रोजगार न मिळाल्यमुळे इतरवेळी बेकारच राहावे लागते. रोजगार मिळण्यावर बंधन येते.
8) शेतमजुरांची मिळकत कमी असल्यामुळे आर्थिक स्तर निम्न आहे त्यामुळे जीवनस्तर किंवा राहणीमानाचा दर्जा उंचावू शकत नाहीत.
9) शेतमजुर पुरूष काम मिळाले नाही तर इतरत्र अन्य ठिकाणी कामासाठी जाऊ शकतो पण महिला शेतमजुर मात्र अन्य ठिकाणी जाऊ शकत नसल्यामुळे बेकारच राहावे लागते.

**सारांश :**

शेतमजूर हा वर्ग देखील देशातील सामान्य जनतेचाच एक भाग आहे देशातील बहुसंख्य जनतेप्रमाणेच तोही गरीब, अशिक्षित किंवा अल्प शिक्षित, आर्थिक दृष्टीने असुरक्षित असा आहे. सामान्य लोकांच्या ज्या सरकारकडुन अपेक्षा असतात तशाच अपेक्षा या शेतमजूरांच्या आहेत. आपली गरीबी हळुहळु दुर व्हावी, कामाची शाश्वती असावी, रहायला छोटेसे का होईना स्वतःचे घर असावे ,मुलाबाळांना शिक्षण, औषधपाणी यांची पुरेशी सोय असावी व आजारीपणात किंवा अकाली मृत्यु आला तर आपले कुटुंब उघडयावर पडु नये मानव म्हणूनआपली आणि आपल्या गरजांची सरकारने आणि समाजाने दखल घ्यावी हीच अपेक्षा या शेतमजूरांची आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

1) महात्मा जोतीराव फुले (2004): शेतक-याचा असूड , पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस.
2) श्रीधर देशपांडे विनायक देशपांडे (2004): भारतीय अर्थव्यवस्था, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस.
3)प्रभाकर देशमुख (2006): श्रमाचे अर्थशास्त्र नागपुर विद्या प्रकाशन.
4) घनश्याम शहा (2008): भारतातील सामाजिक चळवळी, पुणे, डायमंड पब्लिकेशन.
5)मनिषा मनोज चौधरी (2016): मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक अर्थसंवाद, खंड 40, अंक 3.